# जाहीर सूचना

**शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, वर्धा अंतर्गत**
**जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतीक कार्यक्रम सन २०१६-२०१७ दिनांक-५,६व ७ जानेवारी २०१७**
**स्थळ-नि.मु.घटवाई विद्यालय वडनेर पं.स.हिंगणघाट**
**नाश्ता ,चहा व भोजन पुरवणे या करीता दरपत्रक सादर करणे बाबत .**

शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, वर्धा अंतर्गत सन 2016-2017 या वर्षात क्रीडा व सांस्कृतीक कार्यक्रम वडनेर. तालुका हिंगणघाट जिल्हा वर्धा येथे दिनांक 5 /1/2017 ते 7 /1/2017 या कालावधीत आयोजित आहे. सदर क्रीडा व सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता नमूद कालावधीत उपस्थित सर्व विद्यार्थी व शिक्षक, अधिकारी पदाधिकारी तसेच कर्मचारी यांना 1 वेळेचा नाश्ता चहा व दोन वेळेचे जेवण देण्यात येणार आहे. त्याकरीता नाश्ता चहा व भोजनाचा पुरवठा करण्या-या ईच्छूक पुरवठा धारकानीं खालील अटीच्या अधिन राहून दर्शविलेल्या नमुन्यात या कार्यालयाला दिनांक -11/12/2016 पर्यंत आपले दरपत्रक सादर करावे. (कार्यालयीन वेळेत)

## अटी व शर्ती (भोजन व नास्ता)

1. अनामत रक्कम रुपये 9000/- (रूपये नऊ हजार फक्त) या कार्यालयात डिमांड ड्राप्ट / धनादेशाद्वारे दरपत्रक सादर करते वेळी जमा करावा लागेल .
2. आयकर भरला असल्यास मागिल वर्षाचे प्रमाणपत्र सादर करावे सन 2015-16.
3. आयकर Pan Number प्रमाणित प्रत सादर करणे.
4. अन्न औषध भेसळ विभागाचे प्रमाणपत्र. सादर करावे.
5. निविदा धारक क्रिडा सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता नाश्ता व जेवण पुरविण्यास असमर्थ ठरल्यास येणा-या जादा खर्चाची भरपाई पुरवठा धारकाकडुन वसुल केल्या जाईल. याकरीता त्याची. कोणतीही उजर ऐकली जाणार नाही. व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
6. दरपत्रक मान्य करणे /नाकारणे किंवा कोणतेही कारण न देता दरपत्रक रद्य करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वर्धा यांचे कडे राखुन टेवण्यात आलेले आहे.
7. निविदा धारकास निविदा मंजुर झाल्यानंतर रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर सदर अटी मान्य असल्याबाबतचा करारनामा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वर्धा यांना सादर करावा लागेल.
8. पुरवठाधारकांनी शर्ती व अटी नुसार काम असमाधानकारक केल्यास किंवा मध्येच काम सोडुन गेल्यास त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. तसेच अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
9. भोजना मध्ये कोणत्याही प्रकारची अस्वच्छता विषबाधा होणार नाही याची दक्षता पुरवठा धारकाने घ्यावी.
10. शुध्द पाणी (Aqua) पुरविण्याची जबाबदारी आपली राहील.
11. कार्यालयामार्फत भोजन व नास्ता पासेस वितरीत करण्यात येईल त्या पासेस पुरवठाधारकांनी जमा करून त्यानुसारच जेवण नास्ता करणाऱ्यांची संख्या निश्चित करण्यात येईल व देयक अदा करण्यात येईल.
12. सदर दर नमुद करतांना सर्व करासह Vat / service tax सहीत नमुद करण्यात यावे.
13. स्थळ आणि तारखेत बदल करण्याचे अधिकारी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांनी राखून ठेवलेले आहे.
14. दरपत्रक दिलेल्या नमुन्यातच सादर करणे बंधनकारक राहिल .अन्यता दरपत्रक रद्द समजण्यात येईल.

दिनांक- ४ /१२/२०१६

शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
जिल्हा परिषद, वर्धा